# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६१०६०२,२२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail :- desk16.dte@gmail.com Internet :- http//www.dte.org.in


क्र.१६/आस्था/प्रतिक्षा यादी/२०१३/२४५
दिनांक : 11 नवम्बर NOV 2013

प्रति,
१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२) सचिव,
म.रा. तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : ७६१० शासकीय कर्मचाऱ्यांना कर्जे — प्रतिक्षा यादी संचालनालयाच्या वेबसाईटवर प्रदर्शित करण्याबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखाली कार्यालये / संस्थांमधील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे घरबांधणी / संगणक / मोटारवाहन अग्रिमाबाबतचे अर्ज या संचालनालयास ज्या दिनांकासा प्राप्त झालेले आहेत त्या दिनांकानुसार त्यांची प्रतिक्षा यादी करण्यांत आलेली आहे ती सोबत जोडून पाठवित आहे. त्याचे अवलोकन करावे व खालील बाबी तपासून पहाव्यात व त्यामध्ये काही तफावत / बदल असल्यास त्याबाबतचा अहवाल आवश्यक त्या कागदपत्रासह व आपल्या अभिप्रायासह या संचालनालयास ~~तात्काळ~~ दिनांक २५/११/२०१३ पर्यंत सादर करण्यांत यावा.

***तपासणीच्या बाबी :-***

१) अधिकारी / कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम व संस्था

२) घरबांधणी अग्रिमाच्या प्रतिक्षा यादीमध्ये प्रवर्ग नमुद केलेला नसल्यास संबंधितांचा प्रवर्ग.

३) घरबांधणी / संगणक अग्रिमासाठी अर्ज केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची सेवा ५ वर्ष पुर्ण झाली आहे काय ?

४) मोटारसायकल अग्रिमासाठी मुळ वेतन ₹८,५६०/- (ग्रेड पे वगळून) व मोटार कार अग्रिमासाठी मुळ वेतन ₹१९,५३०/- (ग्रेड पे वगळून). इतके मुळ वेतन आहे काय ?

५) तसेच प्रतिक्षा यादीमधील एखादया अधिकारी / कर्मचाऱ्याला जर यापूर्वी सदर अग्रिम मंजुर झालेले आहे काय ?

(आर. पी. गायकवाड)
प्र.उपसंचालक, तंत्रशिक्षण,मुंबई

पृष्ठांकन क्र. विकाऔ/आस्था-३/२०१३/ ८३५५
दिनांक 14 NOV 2013

प्रति,

प्राचार्य, शासकीय अभि. महाविद्यालय/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद,जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,बीड
उस्मानाबाद, पु.ला.लातूर, निवासी महिला लातूर

यांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या अंतर्गत संस्थामधील अधिकारी /कर्मचारी यांच्या **घरबांधणी/मोटार सायकल/ मोटारकार/संगणक अग्रिम** बाबतची प्रतिक्षा यादी संचालनालयाच्या वरील पत्रानुसार प्रदर्शित करण्यात आली असून यादीमध्ये दिलेल्या कर्मचा-यांच्या नावामध्ये उपरोक्त संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे बाबी तपासून पहाव्यात व त्यामध्ये काही तफावत/बदल असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह दि २०-११-२०१३ पर्यंत या कार्यालयास पाठविण्यात यावा. *

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच हे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

* सदरची यादी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर Circulars/ Office Orders या section मध्ये दि. ११/११/२०१३ रोजी प्रदर्शित करण्यात आलेली आहे.